सकाळ

TODAY सातारा

सकाळ
सातारा, शुक्रवार,
१२ फेब्रुवारी २०१६
४

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयातील पारितोषिक वितरणप्रसंगी नारायण सुमंत, डॉ. दीनानाथ पाटील, डॉ. विजयसिंह सावंत आदी.**

# विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा : सुमंत

## कोरेगावात भोसले कॉलेजचे वार्षिक पारितोषिक वितरण

**पळशी, ता. ११** : विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक व कवी नारायण सुमंत यांनी केले आहे.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील होते. श्री. सुमंत म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादनाचा उद्देश समजून घ्यावा. मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग कुटुंबासाठी व समाजासाठी करावा. शिक्षणाच्या बळावर शक्यतांचा शोध घेऊन व्यवसायाला प्राधान्य द्यावे. नम्रता अंगी बाळगल्यास निश्चितपणे मोठेपण मिळते.''. या महाविद्यालयाचा जिमखाना विभाग हा या जिल्ह्याचे भूषण असल्याचे मत डॉ. पाटील यांनी यावेळी व्यक्त केले. प्राचार्य शहाजी डोंगरे यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी एनसीसी, शैक्षणिक, सांस्कृतिक, वक्तृत्व व क्रीडा स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. प्रा. जगन्नाथ शिंदे, प्रा. बाळकृष्ण भोसले यांनी अहवाल वाचन केले. कार्यक्रमास ज्ञानदेव भोसले, बाळासाहेब माने, पृथ्वीराज बर्गे, राजेश बर्गे, चंद्रकांत बर्गे, रामचंद्र बोतालजी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.